नि.दि.दा.क्र. १७९/२०१३
बळवंत व इतर वि. सचिन व इतर

## निशाणी क्र. ६२ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.८ चे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द जाहीर ठराव, निरंतर ताकीद व वैकल्पीकरीत्या वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.८ चारुशीला नरेश कदम या दि.२६.०२.२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हे मौजे सुरुर तालुका वाई येथे राहण्यास असुन प्रतिवादी क्र.८ या पुणे येथे राहणेस होत्या व त्यामुळे त्या मयत झाल्याबाबत वादींना लवकर समजले नाही. तसेच कोरोना महामारीचे प्रार्दुभावाने वादींना प्रतिवादीचा मृत्यूचा उतारा लवकर मिळु न शकल्याने सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.८ विरुध्द अबेट झालेला आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, वादींनी प्रतिवादी क्र.८ चे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र.८ चे वारसांना नि.क्र.७४ नुसार साक्ष समन्स काढुनही ते दाव्यात हजर झालेले नाहीत त्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात येते आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा जाहीर ठराव, निंरतर व तुर्तातुर्त ताकीद मिळणेकामी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ८ चारुशीला नरेश कदम या दि.२६.०२.२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत नि.क्र.७० वर दाखल आहे. सदरचा दावा गुणावगुणावर

निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र.८ चे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द वादींना मयत प्रतिवादी क्र.८ चे वारस म्हणून घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज (नि.क्र.६२) मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.८ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

स्थळ : वाई
दिनांक : २९.०१.२०२४

(आर.एम.भेंडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.

**CERTIFICATE**

" I certify that this Order uploaded is a true and correct copy of original signed Order".

Order dictated on : 29.01.2024.

Order checked and signed on : 29.01.2024.

Uploaded by : S. S. Kumbhar.
Stenographer (Grade-III)

Uploaded on : 29.01.2024.